Dowmloaded from SkillCouncils.com

# ई-निविदा सुचना क्रमांक
## महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद नंदुरबार
## सन 2024-25

महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद, नंदुरबार, दुरध्वनी क्रमांक (02564-210227), ई-मेल icdszpndb@gmail.com मार्फत सन 2023-24 या वर्षातील अनुसूचित जमाती उपयोजना (TSP) निधी लेखाशिर्ष 2225E202(31) निधीतून सन 2024-25 या वर्षात जिल्हयातील बाल विकास प्रकल्प कार्यालयांतर्गत अनुसूचित जमाती प्रवर्गातील मुलींना व महिलांना शिवणकाम व फॅशन डिझाईनिंगचे प्रशिक्षण देणे योजनेंतर्गत जाहिर ऑनलाईन ई-निविदा (E-Tendering) www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्दीस देण्यात येत आहे त्याचा तपशिल खालील प्रमाणे –

| अ.क्र. | योजनेचे नांव | 100 % प्रशासकीय व तांत्रिक मान्यता यांस अधीन 90% शासन हिस्सा रुपये | प्रति लाभार्थी प्रशिक्षण प्रस्तावित दर रुपये | प्रस्तावित दरानुसार अंदाजित लाभार्थी संख्या | प्रशिक्षणाचा दराच्या रकमेस अनुसरुन रुपये 500/- प्रमाणे एकुण 10% लाभार्थी हिस्सा रक्कम रुपये | एकुण प्रस्तावित दरानुसार 90% शासन हिस्सा व 10% लाभार्थी हिस्सासह एकुण रक्कम रुपये | ई-निविदा फॉर्म फी रुपये | ई-निविदा बयाणा (EMD) रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1 | अनुसूचित जमाती प्रवर्गातील मुलींना व महिलांना शिवणकाम व फॅशन डिझाईनिंगचे प्रशिक्षण देणे | 22,50,000 | 5,000 | 500 | 2,50,000 | 25,00,000 | 3,000 | 50,000 |

ई-निविदा खालील वेळापत्रकाप्रमाणे राबविणेत येणार आहे

| अ.क्र. | कार्यवाहीचा टप्पा | कार्यवाही बाबतची तारीख | वेळ |
|---|---|---|---|
| 1 | ई-निविदा प्रसिध्द करणे | दिनांक 12/02/2025 | 10 :00 PM |
| 2 | ई-निविदा कागदपत्रे जमा करावयाची अंतिम तारीख | दिनांक 21/02/2025 | 06:00 PM |
| 3 | ई-निविदेतील तांत्रिक लिफाफा क्रमांक 1 उघडण्याची तारीख | दिनांक 22/02/2025 (शक्य असल्यास) | 12:00 PM/AM |
| 4 | ई-निविदेतील व्यापारी लिफाफा क्रमांक 2 उघडण्याची तारीख | दिनांक 24/02/2025 (शक्य असल्यास) | 12 :00 PM |

सदर ई-निविदा जाहिरात सविस्तरपणे ऑनलाईन संकेतस्थळावर दिनांक 12 /02/2025 पासुन प्रसिध्द करण्यात येत आहे.

1. उपरोक्त कामांची निविदा ई-निविदा प्रक्रियेव्दारे ऑनलाईन प्रसिध्द करणेत येईल. याबाबत भविष्यकाळात सर्व सुचना तसेच शुध्दीपत्रके याकामी इंटरनेटच्या साहाय्याने ऑनलाईन संकेतस्थळावर आवश्यकतेनुसार अद्यावत करण्यात येईल.
2. उपरोक्त कामांबाबतची संपुर्ण माहिती वरील प्रमाणे संकेतस्थळावर उपलब्ध असुन ती वर दिलेल्या कालावधीमध्ये डाऊनलोड करुन घेता येईल.
3. निविदेबाबत आवश्यक बाबी उपरोक्त कागदपत्रे सादर करणेस मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही. पुर्ण भरलेले तांत्रिक लिफाफे ऑनलाईन पध्दतीने निविदा प्रसिध्द करण्यात आलेल्या संकेतस्थळावर जाहिरातीत नमुद केलेल्या दिवशी उघडण्यात येतील.
4. पात्र निविदा धारकांचा वित्तीय लिफाफा क्रमांक 2 तात्काळ उघडण्यात येईल.

---

❖ **बंधपत्र (निविदाधारकाने निविदा भरतांना खालील प्रमाणे बंधपत्र Pdf Format मध्ये करुन ऑनलाईन अपलोड करणे आवश्यक राहिल)**

" मी / आम्ही गांभीर्यपुर्वक नमुद करतो की, मी / आम्ही वर नमुद केलेल्या महिला व मुलींना सौंदय प्रसाधन (ब्युटी पार्लर) प्रशिक्षण देणेकामी निविदेच्या सर्व अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचल्या आहेत. या निविदेसाठी माझे / आमचे दर प्रती लाभार्थी सर्वकरांसह निविदेसोबत असलेल्या BOQ File मध्ये नमुद करीत आहे / आहेत. जर माझी / आमची निविदा स्विकृत करणेत आली तर या निविदेतील सर्व अटी व शर्तींचे तंतोतंत पालन करण्यास मी / आम्ही बांधील राहू. या अटी व शर्तींचा भंग मी / आम्ही केल्यास या निविदेतील अटी व शर्तींमध्ये दिलेल्या तपशीलानुसार मी / आम्ही दंडनीय कारवाईस पात्र राहू. या निविदेच्या सर्व अटी व शर्ती मला / आम्हाला मान्य आहेत."

**स्थळ :**

**दिनांक :** 12/02/2025

निविदाधारकाची सही व शिक्का

---

जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबावि)
जिल्हा परिषद, नंदुरबार

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नंदुरबार

nsultation, please call at 9630030343 or visit at www.SkillCounci

Dowmloaded from SkillCouncils.com

# महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद नंदुरबार

**सन 2023-24 या आर्थीक वर्षातील अनुसूचित जमाती उपयोजना (TSP) निधी लेखाशिर्ष 2225E202(31) निधीतून सन 2024-25 या वर्षात अनुसूचित जमाती प्रवर्गातील मुलींना व महिलांना शिवणकाम व फॅशन डिझाईनिंगचे प्रशिक्षण देणेकामी संस्था निवडीचे नियम व अटी-शर्ती**

---

## निविदा भरणेबाबत मार्गदर्शक सुचना

**लिफाफा क्रमांक 1 : तांत्रिक लिफाफा – या लिफाफ्यात खालील कागदपत्रे आवश्यक आहेत.**

अ) **निविदा फॉर्म फी व बयाणा (EMD) रक्कम**

निविदाधारकाने निविदा फॉर्म फी रक्कम **रुपये 3,000/- अक्षरी रुपये तीन हजार मात्र** तसेच एकुण निविदा रक्कमेच्या **बयाणा EMD रक्कम रुपये 50,000/- अक्षरी रुपये पन्नास हजार मात्र** ऑनलाईन ई-पेमेंट पध्दतीने SBI – IFSC Code No. SBIN0000435 स्टेट बँक खाते क्रमांक 34043020707 मध्ये जमा करणे बंधनकारक आहे.

ब) **इतर अटी व शर्ती**

1. संस्थेची संक्षिप्त टिपणी, घटना, नियमावली इत्यादी
2. निविदाधारक संस्था ही मुंबई सार्वजनिक विश्वस्त कायदा, 1950 तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 अन्वये नोंदणीकृत संस्था असावी तसे प्रमाणपत्र निविदेसोबत सादर करणे आवश्यक आहे.
3. निविदाधारक संस्थेचे GST नोंदणी प्रमाणपत्राची प्रत जोडणे आवश्यक आहे.
4. निविदाधारक संस्थेचे आयकर नोंदणी बाबतचे क्रमांक दर्शविणारे आयकर विभागाचे प्रमाणपत्र (PAN Card) प्रत जोडणे आवश्यक आहे.
5. निविदाधारक संस्थेने मागील तीन वर्षाचे सनदी लेखापाल यांचेकडील वार्षिक ताळेबंद व किमान दोन वर्षाचे Income Tax Return भरल्याचे प्रमाणपत्र निविदेसोबत सादर करणे आवश्यक आहे.
6. निविदाधारक यांची सन 2021-22, 2022-23 व 2023-24 या 3 वित्तीय वर्षाची सरासरी उलाढाल निविदा रक्कमेच्या किमान 75% इतकी असावी त्याबाबत सनदी लेखापाल (CA) यांचेकडील प्रमाणपत्र UDIN सह जोडणे आवश्यक आहे.
7. निविदाधारक संस्था ही कोणत्याही प्रकारे काळ्या यादीत समाविष्ट नसलेबाबत किंवा कोणत्याही शासकीय आस्थापनेशी व्यवहार करण्यास बंदी घालण्यात आलेली नाही अथवा कोणत्याही शासकीय विभागास निविदाधारकाने संस्थेबाबत तक्रार अगर चौकशी प्रलंबित नाही अशा आशयाचे निविदाधारक संस्थेने रुपये 100/-च्या शासकीय मुद्राकांवर (किमान 3 महिन्याच्या आंतील कालावधीतील) प्रतिज्ञापत्र निविदा भरतांना ऑनलाईन अपलोड करणे आवश्यक आहे.
8. निविदाधारक संस्थेने निविदेसाठी लागणारी Earnest Money Deposit (EMD) निविदा रक्कमेच्या 1 % रक्कमेचे रक्कम भरलेबाबत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. अथवा निविदेतील नमुद बयाणा रक्कम भरणेस निविदाधारकास सुट असल्यास त्याबाबत अनुषंगिक दस्तऐवज निविदा भरतांना ऑनलाईन सादर करणे बंधनकारक राहिल.
9. निविदेतील नमुद सर्व अटी-शती मान्य असलेबाबत निविदाधारकांनी निविदा भरतांना सोबतचे नमुना बंधपत्र अधिकृत सहीशिक्यानिशी अपलोड करणे बंधनकारक आहे. आवश्यक तेथे मुखत्यारपत्राची प्रत जोडावी.
10. प्रस्तावित प्रशिक्षणासाठी विषयानुरुप तज्ञ मार्गदर्शक व प्रशिक्षक संस्थेकडे उपलब्ध असल्याबाबत तपशील नमुद करुन निविदा भरतांना ऑनलाईन अपलोड करणे आवश्यक आहे.
11. निविदेत सहभागी संस्थेने यापुर्वी शासकीय / निमशासकीय विभागामार्फत प्रस्तावित प्रशिक्षण यापुर्वी मागील गत वर्षात दिले असल्याबाबत अनुभव प्रमाणपत्र / आदेश निविदा भरतांना ऑनलाईन अपलोड करणे आवश्यक राहिल.
12. प्रस्तावित प्रशिक्षणाबाबत विषयानुरुप सविस्तर टिपणी निविदा भरतांना ऑनलाईन अपलोड करणे बंधनकारक राहिल.
13. निविदेतील नमुद अटी व शर्ती मान्य असल्याचे हमीपत्र निविदाधारक संस्थेस Online Upload करणे आवश्यक आहे.
14. निविदाधारक एजन्सीने निविदेतील सर्व अटी-शर्तीनुसार त्यांचेकडील सादर करण्यात येणारे दस्तऐवजांची सत्यता व विश्वसनीयतेबाबत स्वखर्चाने रुपये 500/- मात्रच्या मुद्रांक पेपरवर प्रतिज्ञापत्र केलेले दस्तऐवज निविदा भरतांना सादर करणे आवश्यक राहिल.

**वरील नमुद केलेप्रमाणे लिफाफा क्रमांक 1 मधील अ आणि ब मध्ये नमुद केलेली कागदपत्रे ऑनलाईनरित्या जिल्हा परिषदेस सादर करणे बंधनकारक आहे. तसेच बयाणा रक्कमेबाबतची पुर्तता होत नसल्यास निविदा वैध ठरविली जाणार व त्या निविदाधारकाच्या दराचा लिफाफा उघडणेत येणार नाही. वरील नमुद केलेप्रमाणे कोणतेही एक जरी कागदपत्र नसेल त्या निविदाधारकाची निविदा अग्राहय होईल. तांत्रिक लिफाफ्यातील कागदपत्रांची अर्हतेत तपासणी व खात्री झालेल्या पात्र निविदाधारकांचेच व्यापारी लिफाफे उघडण्यात येतील.**

**जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबावि)**
**जिल्हा परिषद, नंदुरबार**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, नंदुरबार**

ultation, please call at 9630030343 or visit at www.SkillCour

Dowmloaded from SkillCouncils.com

## लिफाफा क्रमांक 2 : दराबाबतचा लिफाफा –
## प्रशिक्षणाकरीता ई-निविदेतील इतर अटी-शर्ती :

1. प्रस्तावित प्रशिक्षणाचे दर मंजुरीचे अधिकार तसेच दर काम विभागून देण्याचे अधिकार तसेच दर निश्चित करण्याचे अधिकार, संस्था निवड दर मंजुरी अंशतः अथवा पुर्णतः स्विकारण्याचे अथवा कोणतेही कारण न देता नाकारण्याचे तसेच दर ठरवून देण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी राखून ठेवले आहेत. संस्था निवडीचे आदेश देतांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा निर्णय अंतिम राहिल.
2. सशर्त निविदा विचारात घेतली जाणार नाही अगर ग्राहय धरण्यात येणार नाही. एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क राखून ठेवला आहे.
3. प्रस्तावित प्रशिक्षणाकरीता संस्थेकडे प्रशिक्षीत तज्ञ मार्गदर्शक, विषयानुरुप प्रशिक्षण साहित्य, आवश्यक साधन सामुग्री इत्यादी मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध असावी. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नंदुरबार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.
4. **निविदेतील पात्र निविदाधारक संस्थेस प्रशिक्षणासाठी उपस्थित प्रशिक्षणार्थी यांना शिवणकाम प्रशिक्षणासाठी आवश्यकतेनुसार विषयानुरुप माहिती पुस्तिका तसेच आवश्यक साहित्य-सुविधा (सुई, दोरा, शिलाई मशिन, कात्री, स्केल इत्यादी अनुषंगिक साहित्य) प्रशिक्षणार्थी यांना प्रशिक्षण कालावधीत उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहिल.**
5. **नंदुरबार जिल्हयांतर्गत एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्पातील प्रशिक्षणार्थी यांना प्रस्तावित योजनेंतर्गत तज्ञ विषय मार्गदर्शकामार्फत प्रति लाभार्थीसाठी रोज 5 तास याप्रमाणे एकुण 150 तास गुणवत्तापूर्ण शिवणकाम प्रशिक्षण देऊन सदर प्रशिक्षण हे साधारणतः एकुण 30 दिवसांत / माहे मार्च 2025 अखेर पुर्ण करणे बंधनकारक राहिल.**
6. **प्रस्तुत प्रशिक्षण देणेकामी पात्र निविदाधारक संस्थेकडून प्रशिक्षणार्थी यांची स्वतंत्र तुकडी (बॅच) तयार करुन तज्ञ प्रशिक्षकांमार्फत एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प कार्यालय क्षेत्रातील ग्रामीण भागातील महिला व मुलींची तालुकानिहाय समप्रमाणात लाभार्थी संख्या निश्चित करुन प्रशिक्षण सदर प्रशिक्षण दिल्या जाणाऱ्या विहित कालावधीत पूर्ण करणे व प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रशिक्षणार्थी यांना छापील रंगीत प्रमाणपत्र देणे ~~करणे~~ बंधनकारक राहील.**
7. **विभागाच्या वतीने प्रस्तावित करण्यात आलेल्या प्रशिक्षणासाठी प्रति प्रशिक्षणार्थी / लाभार्थी प्रशिक्षणाचा प्रस्तावित दर हा जास्तीत जास्त रुपये 5000/- मात्र आहे. त्यानुसार प्राप्त अनुदानाच्या अनुषंगाने एकुण 500 प्रशिक्षणार्थी / लाभार्थी यांना प्रशिक्षण देणे आवश्यक राहिल. तथापि, निविदेत प्रती लाभार्थी करीता प्राप्त झालेल्या न्युनतम दरानुसार प्रस्तुत योजनेच्या 90% शासन हिस्सा मंजुर रक्कमेतून प्रशिक्षण देणेकामी प्रशिक्षणार्थी/लाभार्थी यांची संख्या कमी / अधिक करुन प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेची निवड करण्यात येईल.**
8. प्रस्तावित योजनेच्या निविदेत प्रति प्रशिक्षणार्थी करीता प्रशिक्षणाच्या दर हा 10% लाभार्थी हिस्सासह व सर्व करांसहित BOQ File यांत नमुद करणे आवश्यक आहे व त्यानुसार निविदेत प्रति प्रशिक्षणार्थी करीता प्राप्त होणाऱ्या दरातून 10% लाभार्थी हिस्सा वजावट करुन एकुण प्रशासकीय मंजुर रक्कमेतून 90% रक्कमेत निविदेत प्राप्त होणाऱ्या न्युनतम दरानुसार लाभार्थी संख्या निश्चित करण्यात येईल.
9. प्रशिक्षणाचे देयक हे एकुण प्रस्तावित योजनेच्या प्रशासकीय मान्यता शासन हिस्सा 90% रक्कमेतून अदा करण्यात येईल व उर्वरीत 10% लाभार्थी हिस्सा रक्कम ही तालुकास्तरावरील त्या-त्या प्रकल्प कार्यालयांच्या अधिकार क्षेत्रातील प्रशिक्षणार्थी / लाभार्थीकडून प्रकल्प कार्यालयाच्या समन्वयाने परस्पर वसुल करुन जिल्हा परिषदेच्या ठेव खात्यात जमा केल्याबाबत पोहच सादर केल्यानंतर व लाभार्थी हिस्सा जमा झाल्याची खात्री झाल्यावर संबंधीत निविदेतील कार्यारंभ आदेश मंजुर असलेल्या संस्थेस अदा करण्यात येईल.
10. प्रशिक्षणार्थींची सुरक्षिततेची व संरक्षणाची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत निविदाधारक संस्थेची राहिल.
11. **सदरचे प्रशिक्षण जिल्हयांतर्गत प्रत्येक तालुक्यात एबाविसेयो प्रकल्पस्तरावर / तालुकास्तरावर / जेथे महिला व मुलींना प्रशिक्षण घेणे सोयीचे राहिल अशा ठिकाणी प्रशिक्षण ठिकाण निवड करुन प्रशिक्षण आयोजित करावे लागेल. यासाठी बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना प्रशिक्षणाचे नियोजन देऊन व त्यांच्या बरोबर समन्वय ठेवून प्रशिक्षण सत्राचे आयोजन करावे लागेल व त्याबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत जिल्हाकक्षास अवगत करणे बंधनकारक राहील.**
12. प्रशिक्षणकाळात प्रशिक्षणार्थीचे उपस्थिती बाबत मास्टर हजेरीपत्रक रजिस्टर व आधार संलग्न उपस्थिती तसेच प्रशिक्षणाचे फोटो, उद्घाटनाचे व प्रशिक्षण चालू असतांनाचे फोटो व प्रशिक्षणाचे व्हिडीओ शुटींग केलेबाबत पेनड्राईव्ह संबंधीत संस्थेस देयक सादर करतांना बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचेकडून प्रमाणित करुन सादर करणे आवश्यक राहिल.
13. देयक सादर करणेपुर्वी प्रशिक्षण यशस्वीपणे राबविल्याबाबतचे प्रमाणपत्र बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचेकडून प्राप्त करणे बंधनकारक राहिल.
14. निविदा मध्ये दिलेल्या अटी व शर्ती व्यतिरिक्त काही अतिरिक्त अटी शर्तींचा समावेश करण्याचा अगर अट शिथील करण्याचा अधिकार योजना राबविण्याचा कोणत्याही टप्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नंदुरबार यांना राहिल.

ultation, please call at 9630030343 or visit at www.SkillCoun

Dowmloaded from SkillCouncils.com

15. अटी-शर्तीनुसार पात्र ठरलेल्या निविदाधारकांचेच व्यापारी लिफाफे उघडण्यात येतील व BOQ File मधील दरांची तुलना करणेत येऊन त्यामधुन निविदाधारक संस्था निश्चित करणेत येईल.
16. प्रस्तावित योजनेच्या ई-निविदेत तांत्रिक दृष्टया पात्र होणाऱ्या संस्थेकडून प्रस्तुत योजनेंतर्गत लाभार्थ्यांना कशा प्रकारे प्रशिक्षण देण्यात येईल? याबाबत आवश्यकतेनुसार प्रशिक्षणाचे सादरीकरण (TRAINING DEMO) मुख्य कार्यकारी अधिकारी व त्यांचे अधिनस्त अधिकारी यांचे समक्ष सादर करणे अनिवार्य राहिल. ज्या निविदाधारक संस्थेचे सादरीकरण समाधानकारक असेल त्याच निविदाधारकाचा निविदेत विचार करण्यात येईल याबाबत निर्णय घेण्याचे सर्व अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.नंदुरबार यांना राहतील.
17. निविदाधारक संस्था यांनी कार्यारंभ आदेशातील अटी शर्तीनुसार प्रशिक्षण न दिल्यास अथवा निविदाधारक संस्थेने असमर्थता दर्शविल्यास अथवा तसे निदर्शनास आल्यास त्या निविदाधारक संस्थेचे नांव काळया यादीत समाविष्ट करण्यात येईल. याबाबत सर्व अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नंदुरबार यांना राहतील.
18. प्रशिक्षण संस्था निवडीचा आदेश निर्गमित झालेनंतर आदेशातील अटी व शर्तीनुसार प्रशिक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी बाबत योग्य त्या मुद्रांकपेपरवर निविदाधारक संस्थेने स्वखर्चाने करारनामा करुन देणे आवश्यक राहिल.
19. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नंदुरबार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.
20. निविदेतील संस्था निवड व प्रशिक्षणाचे दर मंजुरीचे अधिकार तसेच काम विभागून देण्याचे अधिकार तसेच दर निश्चित करण्याचे अधिकार, संस्था निवड दर मंजुरी अंशतः अथवा पुर्णतः स्विकारण्याचे अथवा कोणतेही कारण न देता नाकारण्याचे तसेच दर ठरवून देण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी राखून ठेवले आहेत. संस्था निवडीचे आदेश देतांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा निर्णय अंतिम राहिल. त्याबाबत कोणतेही वाद अगर तक्रार ग्राहय धरण्यात येणार नाही तसेच न्यायालयात दाद मागता येणार नाही.
21. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नंदुरबार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.
22. योजना राबवितांना काही अपरिहार्य कारणास्तव अगर तांत्रिक अडचणीमुळे अथवा अन्य कारणामुळे प्रशिक्षणाचे देय रक्कमेचा अदायगीस विलंब झाल्यास त्याबाबत कुठल्याही प्रकारचे व्याज/विलंब आकार/संबंधीत संस्था मागणी करणार नाही तसेच न्यायालयात दाद मागता येणार नाही.

जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबावि)
जिल्हा परिषद, नंदुरबार

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नंदुरबार

Consultation, please call at 9630030343 or visit at www.SkillCouncils.